महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २६१ वे दिनांक : १७/०९/२०२६ वार : गुरुवार


## भुजबळांचा गौप्यस्फोट: जरांगेंच्या भाषेवर मंत्र्यांमध्ये संताप!



**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघालेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावरून आणि सातत्याने नेत्यांवर वापरल्या जाणाऱ्या भाषेवरून राज्य मंत्रिमंडळात प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आल्याचा खळबळजनक खुलासा ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. "कॅबिनेट बैठक संपल्यानंतर अधिकारी बाहेर पडताच जवळपास प्रत्येक मंत्र्याने जरांगेंच्या भाषेवर तीव्र संताप व्यक्त केला. ही न थांबणारी गाडी झाली असून मुख्यमंत्र्यांपासून मंत्र्यांपर्यंत अत्यंत हीन पातळीवर जाऊन बोलले जात आहे," अशी इनसाइड स्टोरी भुजबळ यांनी उघड केली. एका वृत्तवाहिनीशी ते बोलत होते. कॅबिनेट बैठकीतील बंद दाराआडच्या चर्चेचा पाढा वाचताना भुजबळ म्हणाले, "मंत्रिमंडळाची अधिकृत बैठक आटोपल्यानंतर सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना बाहेर पाठवण्यात आले. त्यानंतर मंत्र्यांमध्ये या विषयावर चर्चा सुरू झाली. मी कोणाची नावे घेत नाही, पण उपस्थित प्रत्येक मंत्र्याने संताप व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांच्या वडिलांबद्दल बोलले जाते, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आईचा उल्लेख करून अपशब्द वापरले जातात, इतर नेत्यांविषयी घाणेरडी भाषा वापरली जाते. इतकेच काय, आंदोलनावेळी तिथे गेलेल्या महिला जिल्हाधिकाऱ्यांशीही अत्यंत अपमानास्पद पद्धतीने संवाद साधला गेला. हे चाललेय तरी काय?" असा प्रश्न सर्वांनी विचारला. "सरकारने त्यांच्या 13 पैकी 12 मागण्या मान्य केल्या, तरीही त्यांची गाडी थांबायला तयार नाही. कॅबिनेटमध्ये जेव्हा सगळे मंत्री यावर बोलू लागले, तेव्हा मी शांत राहून मनात म्हटले— 'देर आये, दुरुस्त आये'. आम्ही सुरुवातीला बोलत होतो तेव्हा कोणी गांभीर्याने घेत नव्हते, आता सर्वांना त्याची झळ बसत आहे.“ आपण जरांगेंच्या विरोधात आक्रमक भूमिका का घेतली, याचा घटनाक्रम सांगताना भुजबळ म्हणाले, "सुरुवातीला तो माझ्यावर सतत बोलत होता, पण मी त्याकडे साफ दुर्लक्ष केले. मात्र, जेव्हा आंदोलनाच्या नावाखाली आमदारांची घरे जाळली गेली, कार्यकर्त्यांचे हॉटेल्स पेटवून राख केली गेली आणि संपूर्ण बीड शहर पेटवले गेले, तेव्हा परिस्थिती हाताबाहेर गेली होती.“ "पोलीस हतबल झाले होते, कोणी काही बोलायला तयार नव्हते. तिथे परिस्थितीची पाहणी करायला जाणारा मी पहिला नेता होतो. शांततेत चालणाऱ्या आंदोलनाला विरोध नव्हता; पण घरं जाळली जात असताना मी शांत बसू शकत नव्हतो. त्यामुळेच मी राजीनामा खिशात घालून अंबडला ओबीसींची महाएल्गार सभा घेतली आणि त्यातून ओबीसींची खरी ताकद समोर आली.“ मराठा आरक्षणाच्या कायदेशीर बाबींवर बोट ठेवत त्यांनी स्पष्ट केले. "मनोज जरांगे यांचा कायद्याचा किंवा आरक्षणाचा कोणताही अभ्यास नाही. सरकारने मराठा समाजाला भरभरून निधी दिला आहे, शैक्षणिक आणि सामाजिक सवलती दिल्या आहेत. जरांगेंच्या १३ पैकी १२ मागण्या सरकारने पूर्ण केल्या; मात्र जी एक मागणी कायद्याच्या चौकटीत बसतच नाही, ती सरकार कशी पूर्ण करणार? कायद्याचे उल्लंघन करून सरकारने निर्णय घ्यावा का?“ महायुती सरकारला सावध करताना ते म्हणाले, "या सरकारला ६० ते ७० टक्के ओबीसी समाजाने भरभरून मतदान केले आहे. त्यामुळे मराठा समाजाला जे देता येईल ते कायद्याने द्या; पण त्याचवेळी ओबीसी समाज नाराज होणार नाही याची काळजी सरकारने घेतलीच पाहिजे.“ निवडणुकीत एकनाथ शिंदे यांना जरांगेंच्या आंदोलनाचा फायदा झाला का, या प्रश्नावर भुजबळ म्हणाले, "मला तसे मुळीच वाटत नाही. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचे काम यामुळे महायुतीला विजय मिळाला. जरांगेंनी विधानसभा निवडणुकीत आधी उमेदवारी अर्ज भरण्यास सांगितले आणि ऐनवेळी माघार घेतली. ते येवल्यात माझ्या विरोधात प्रचार करायला येऊन बसले होते, तरीही जनतेने मला निवडून दिले.“ "सध्याच्या गणेशोत्सवावर कोणाचा प्रभाव आहे, असे विचारले तर नकारात्मक दृष्टीने जरांगे आणि सकारात्मक दृष्टीने पुण्याचे बापट यांचा प्रभाव दिसतो.“ महायुतीत अर्थखाते हे राष्ट्रवादी काँग्रेसकडेच होते आणि ते पुन्हा पक्षालाच मिळायला हवे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच आमदार धनंजय मुंडे हे एका मोठ्या समाजाचे नेतृत्व करत असल्याने त्यांना मंत्रिमंडळात पुन्हा स्थान जरूर मिळाले पाहिजे; मात्र जागा किती उपलब्ध आहेत त्यानुसार पक्षाचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

## दिशा सालियन प्रकरणावर आदित्य ठाकरेंचा संताप!



**मुंबई :** सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरणी सीबीआयने 13 सप्टेंबर रोजी नव्याने एफआयआर दाखल केल्यामुळे या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या नव्या एफआयआरमध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांसारख्या बड्या राजकीय नेत्यांच्या नावांचा उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे या प्रकरणातील तपासाच्या हालचाली आता जलदगतीने सुरू झाल्या असून, सीबीआयने या केसचा तपास आपला 'हुकमी एक्का' मानल्या जाणाऱ्या गोल्ड मेडलिस्ट महिला अधिकारी एसपी सीमा पाहुजा यांच्याकडे सोपवला आहे.

दरम्यान, आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले जात असून यावर त्यांनी ट्विट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, अफवांचा धुरळा उडवणं बंद करण्यासाठी पुन्हा एकदा फक्त आणि फक्त तथ्य सांगतो. मी दिशा सालियन ह्यांना कधीही भेटलेलो नाही किंवा त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या 6 वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझे नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरु असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला आहे.

पुढे आदित्य ठाकरे म्हणाले, कुठलेही तथ्य आणि सत्य नसलेले हे सततचे खोटे कँपेन दुर्दैवी आहे. बोंबाबोंब करुन केल्या जाणाऱ्या टिव्ही चॅनल्सवरच्या खोट्या चर्चा आणि मिडिया ट्रायल्स सत्य बदलू शकत नाहीत. अधिकृत यंत्रणांना कुठल्याही व्यत्ययाशिवाय, राजकीय हस्तक्षेपाशिवाय, चारित्र्यहननाशिवाय आणि निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा नव्याने ही चौकशी करु द्या.

तसेच परत एकदा सांगतो, ज्यांना वाटत असेल की अश्या चारित्र्यहननाच्या आणि खोट्या प्रचाराच्या मार्गाने तुम्ही आम्हाला शांत बसवू शकाल तर तो तुमचा भ्रम आहे. सत्यासाठी, अन्यायाविरुद्ध, देशवासीयांना सोबत घेऊन आमचा लढा सुरुच राहील, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १७ सप्टेंबर २०२६


## करपलेली शेती, तहानेने व्याकूळ पशुधनासाठी मुस्लिम बांधवांची आर्त प्रार्थना; बुधवारीही विशेष नमाज



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पावसाने दडी मारल्याने जिंतूर तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे. पावसाअभावी शेती पिकांवर संकट ओढावले असून, पशुधनासाठीही पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरातील मुस्लिम बांधवांनी मंगळवारी (दि. १५ सप्टेंबर) शमशोद्दीन ईदगाह येथे नमाज-ए-इस्तिस्का अदा करून पावसासाठी अल्लाहकडे आर्त साकडे घातले.धर्मगुरूंच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सामूहिक प्रार्थनेला मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पावसासाठी दुआ मागताना अनेकांचे डोळे पाणावले. शेतशिवार हिरवेगार व्हावे, पिकांना जीवदान मिळावे, जनावरांची तहान भागावी आणि परिसरावर अल्लाहची रहमत बरसावी, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.मौलाना तजमुल अहमद खान यांच्या उपस्थितीत नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर पावसासाठी विशेष दुआ करण्यात आली. सध्याच्या पावसाच्या प्रतीक्षेमुळे शेतकरी वर्गासह पशुपालकांमध्येही चिंता निर्माण झाली असून, पिके व पशुधनाला दिलासा मिळण्यासाठी पावसाची नितांत गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी मुफ्ती कलीम बेग यांनी नागरिकांना प्रामाणिकपणे आचरण करण्याचे आवाहन केले. आर्थिक व्यवहार पूर्ण करावेत, गरजू व गरीब कुटुंबांना सढळ हाताने मदत करावी, तसेच खोटे बोलणे टाळावे, असे त्यांनी सांगितले.दरम्यान, बुधवारी सकाळी १० वाजता साखरतळा रस्त्यावर पावसासाठी विशेष नमाज अदा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या विशेष नमाजासाठी हजारो समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.या सामूहिक प्रार्थनेला धर्मगुरू, नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संकटाच्या काळात पावसासाठी करण्यात आलेल्या या सामूहिक प्रार्थनेमुळे जिंतूर शहरातील सामाजिक एकोपा आणि धार्मिक श्रद्धेचे दर्शन घडले.

## लोप पावत चाललेली अस्सल बोली जतन करण्यासाठी 'माझ्या आजी - आजोबाची बोली' उपक्रम

**कन्नड** - ग्रामीण भागातील अस्सल बोलीभाषा आणि त्या बोलीतील लोप पावत चाललेले शब्द जतन करण्यासाठी एक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.त्रैमासिक 'तिफण' पुरस्कृत बोलीभाषा व लिपी संशोधन - प्रशिक्षण केंद्र आणि मराठी भाषा संशोधन केंद्र, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा विभागस्तरीय 'माझ्या आजी-आजोबाची बोली' हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.या उपक्रमाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय भोसले असून, संयोजक व समन्वयक म्हणून डॉ. शिवाजी हुसे (संपादक, तिफण) आणि समन्वयक म्हणून डॉ. रामचंद्र झाडे काम पाहत आहेत.उपक्रमाचा उद्देश काय?शहरीकरण आणि प्रमाण भाषेच्या प्रभावामुळे आपली अस्सल ग्रामीण बोली, म्हाताऱ्या माणसांच्या तोंडातील गोड शब्द काळाच्या पडद्याआड जात आहेत. तेच 100 अस्सल शब्द नव्या पिढीने आपल्या आजी-आजोबांकडून ऐकून, लिहून जतन करावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.कोण सहभागी होऊ शकतो?मराठवाडा विभागातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील सर्व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.विद्यार्थ्यांनी काय करायचे?१. आपल्या आजी किंवा आजोबांकडून बोलीभाषेतील १०० अस्सल शब्दांचे संकलन करायचे.२. हे शब्द कागदाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरात लिहायचे.३. एका स्वतंत्र पानावर संकलक म्हणून स्वतःचे नाव, इयत्ता / वर्ग, शाळेचे संपूर्ण नाव, तालुका, जिल्हा आणि मोबाईल नंबर लिहायचा.कालावधी: १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२६संकलन पाठवण्याचा पत्ता:डॉ. शिवाजी हुसे, मराठी विभाग प्रमुख,शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर - ४३११०३संपर्क: ९४०४० ०० ३९८या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक प्रमाणपत्र देण्यात येणार असून, निवडक शब्द संकलन त्रैमासिक 'तिफण' या नियतकालिकात प्रसिद्ध केले जाणार आहे.तरी मराठवाड्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि शाळांनी या बोली संवर्धनाच्या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सीरत-ए-नबी ﷺ निबंध लेखन स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश



**जळगाव :** वहदत-ए-इस्लामी हिंद, जळगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सीरत-ए-नबी ﷺ निबंध लेखन स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जळगावच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत तीनही प्रमुख पारितोषिके पटकावली.या स्पर्धेत हस्सान इकबाल याने प्रथम क्रमांक मिळवत ₹१,००० रोख व प्रमाणपत्र, शाफिया तनवीर हिने द्वितीय क्रमांक मिळवत ₹७०० रोख व प्रमाणपत्र, तर अनस अय्यूब चौधरी याने तृतीय क्रमांक मिळवत ₹५०० रोख व प्रमाणपत्र प्राप्त केले.सीरत-ए-नबी ﷺ विषयावर आधारित या लेखन स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना चार विविध विषय देण्यात आले होते.विद्यार्थ्यांनी आपल्या लेखनातून विषयाची प्रभावी मांडणी करत उत्कृष्ट लेखनकौशल्य, विचारक्षमता आणि अभिव्यक्तीचे दर्शन घडविले. विजेत्या विद्यार्थ्यांना वहदत-ए-इस्लामी हिंद, जळगावचे जबाबदार शकील खान सर व इब्राहीम साहेब यांच्या हस्ते रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सीरत-ए-नबी ﷺ विषयाचा अभ्यास, वाचनाची आवड तसेच लेखन व अभिव्यक्ती कौशल्य विकसित होण्यास प्रोत्साहन मिळाले.

## कन्नड येथे महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन

**कन्नड :** त्रैमासिक तिफण आणि तिफण वाचक चळवळीच्या वतीने महात्मा जोतिराव फुले द्विजन्मशताब्दी जयंती निमित्त महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे होणार आहे.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून तिफण वाचक चळवळीचे मार्गदर्शक मा. अॅड. कृष्णा जाधव आणि नायब तहसीलदार, कन्नड मा. दिलीपकुमार सोनवणे हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे प्राचार्य डॉ. विजय भोसले हे राहणार आहेत.यावर्षीचा महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार खालील मान्यवरांना प्रदान करण्यात येणार आहे :डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. संजय भालेराव, डॉ. प्रकाश खेत्री, प्रा. रामनाथ टेकाळे, डॉ. आर. एम. घोती, दिपाली घुगे, अनिता राठोड, किशोर घुगे आणि प्रवीण दाभाडे.या कार्यक्रमाचे संयोजन तिफणचे संपादक तथा शिवाजी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले असून, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड व अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे, शाखा कन्नड यांच्या सहकार्याने हा सोहळा होत आहे.तरी या पुरस्कार प्रदान समारंभास शिक्षक, साहित्यिक, विद्यार्थी व तिफणच्या वाचकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १७ सप्टेंबर २०२६


# माझा मराठवाडा

पाषाणावर पिंपळापरी, जगतोय मराठवाडा
दुष्काळाच्या वणव्यात,होरपळतोय मराठवाडा.

घोषणांच्या चिंब पावसात, रडतोय मराठवाडा
बळीराजाचा फास सोडण्या,झटतोय मराठवाडा.

अजिंठ्याची लेणी कोरतो,काळजात मराठवाडा
पितळखोरा अन् वेरुळात,शांती बुद्ध मराठवाडा.

देवगिरीचा किल्ला सांगतो, अभेद्य मराठवाडा
गौताळयाच्या वनात खुलतो, हिरवा मराठवाडा.

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, गातोय मराठवाडा
शंकरस्वामी बहिणाईसंगे, आषाढ वारीत मराठवाडा.

गोदा शिवना पूर्णा मांजरा, दुधनेत मराठवाडा
पाण्यासाठी तळमळतोय, तहानलेला मराठवाडा.

स्वराज्याला देण्या प्रेरणा, तुळजापुरी मराठवाडा
छत्रपतींचे माहेर शोभतो, घृष्णेश्वरी मराठवाडा.

मिलिंद' व्हावा लेक म्हणून,झटतोय मराठवाडा.
गीतामृत जगा पाजण्या, सिद्ध ज्ञानदेव मराठवाडा.

आद्य मराठी सरला बेटी, म्हाइंभट मराठवाडा
अस्पृश्यता गोदेत गाडतो, शांतीब्रम्ह मराठवाडा.

गुरूग्रंथात शोभे अभंग, नामयाचा मराठवाडा
जनाईच्या पिठात भेटतो, पांडुरंगास मराठवाडा.

देव तुडवितो माती, पाहुनी गोरोबा मराठवाडा
साई श्रद्धा अन् सबुरी,सांगे पाथरीत मराठवाडा.

दख्खनचा ताज शोभतो, बावन्न दरवाजी मराठवाडा
नांदेडी गुरुद्वारा अन् जांब समर्थी मराठवाडा.

महाराष्ट्रात बिनशर्त सामील,आज जरी मराठवाडा
अजूनही का मागासलेला, माझा प्रिय मराठवाडा.




**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**


# भूमिका शेंडगे चा भारतात तिसरा क्रमांक शुटिंग मध्ये रचला नविन इतिहास



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाची कॅडेट भूमिका शेंडगे चा सत्कार करण्यात आला . दिल्ली येथे 01 ते 12 सप्टेंबर 2026 मध्ये पार पडलेल्या थल सैनिक कॅम्प मध्ये फायरिंग स्पर्धेमध्ये तिची मुलीं च्या महाराष्ट्राच्या संघात निवड झाली होती.महाराष्ट्र निदेशालय ,छत्रपती संभाजी नगर ग्रुप,53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथुन भूमिकाने ऐतिहासिक कामगिरी केली व अनेक रेकॉर्ड तिने आपल्या नावे केले. फायरिंग स्पर्धेत आता पर्यंतच्या एनसीसी च्या इतिहासात छ संभाजीनगर , एनसीसी लातूर व शिवाजी महाविद्यालयाची ती सहभाग घेणारी पहिलीच मुलगी होती आता पर्यंत हे ऐतिहासिक कामगिरी कोणीच केली नव्हती महाराष्ट्राच्या संघात निवड होणारी ती पहिलीच मुलींचा मान तिला मिळाला व महाराष्ट्राच्या संघाला भूमिका ने तिसरा क्रमांक रजत पदक मिळऊन दिले तिने सिद्ध करून दाखवले की कठोर परिश्रम,शिस्त, अनुशासन,वेळेचे भान आणि रात्रंदिवस सराव याच गोष्टी यश मिळवण्यासाठी कारणीभूत असतात यामुळेच तिने दिल्ली येथे महाराष्ट्राचा फायरिंग मध्ये पताका रोवला. जिद्द ,चिकाटी वआत्मविश्वास या गोष्टीचा दैनंदिन जीवनात उपयोग केला तर छोट्याशा गावातून सुद्धा राष्ट्रीय स्तरापर्यंत विजय मिळवता येते हे तिच्या कामगिरीतून दाखवुन दिले.दिल्ली येथे देशातून एकूण 17 एनसीसी निदेशालय ने सहभाग नोंदवला होता या मध्ये महाराष्ट्राला दुसरा क्रमांक मिळाला त्यामध्ये भूमिका ने शुटिंग मध्ये तिसरा क्रमांक मिळवून महाराष्ट्राचा अभिमान तिने देश पातळीवर गाजवला . छोट्याशा कोरेगाव वाडी येथील गावातुन तिचा प्रवास सुरु होतो सलग चार महिण्यामध्ये जवळपास पंधरा कँप मध्ये सहभाग नोंदवला व दिल्ली मध्ये महाराष्ट्राचा थल सैनिक कँप मध्ये झेंडा रोवला . अनेक रेकॉर्ड ची नोंद या दिल्ली येथील कँपमध्ये नोंदवण्यात आली .मागील सलग चार महिन्यापासून अतिशय खडतर कॅम्पमधून तिने दाखवून दिले की योग्य दिशा मार्गदर्शन, आत्मविश्वास,त्याग,मेहनत, प्रबळ आत्मविश्वास, वेळेचे नियोजन व कामावर निष्ठा असेल तर हे यशापासुन कोणीच रोखू शकत नाही हे तिने तिच्या कार्याच्या यशातून दाखवून दिले . तत्पुर्वी शहरातील बसस्थान का पासुन महाविद्यालया पर्यंत तिची वाजत-गाजत मिरवणुक काढण्यात आली या अभिमाना च्या क्षणी सर्व उमरगावासी उपस्थित होते .तिच्या यशामागे नेहमी खंबीरपणे मार्गदर्शन करणारे 53 महाराष्ट्रात बटालियन एनसीसी लातूर कार्यालयाचे कमान अधिकारी कर्नल संतोष नवगण, प्रशासकीय अधिकारी कर्नल वाय बी सिंग तसेच कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर,यांचे मार्गदर्शन लाभले असून या यशाबद्दल उमरगा परिसरात तिचे सर्व दूर नावलौकिक होत आहे .या यशिस्वेते बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ प्राचार्य डॉ संजय अस्वले,डॉ पदमाकर पिटले, डॉ विनोद देवरकर ,कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर,प्रा गुंडाबापू मोरे,प्रा शैलेश महामुनी,राजकुमार सोनवणे ,नितीन कोराळे,निळकंठ माने सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका, शिक्षेकेत्तर कर्मचारी, कॅडेटसच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या .







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १७ सप्टेंबर २०२६

# लोकजीवनातूनच घडला माझा पिंड

निसर्गाची ओढ मला लहानपणापासूनच आहे. ही ओढ केवळ झाडे, नदी, डोंगर पाहण्याची नाही. तर निसर्गातील रूप आणि अरूप यामागचे कुतूहल मला लहानपणापासून सतावत आले आहे.नदीकडे पाहताना मला फक्त वाहते पाणी दिसत नाही. तिचा खळखळाट, काठावरची ओली माती, पाण्यावर पडलेले उन्हाचे कवडसे हे तिचे रूप आहे, पण समुद्राला मिळण्याची तिची अखंड ओढ हे तिचे अरूप आहे. झाडाचे पान, फूल, फांदी हे त्याचे रूप आहे, पण जमिनीला घट्ट धरून ठेवणारी त्याची मुळे हे त्याचे अरूप आहे. पशुपक्ष्यांचे जग, डोंगराची अचलता, आभाळाची विशालता यातील हेच रूप-अरूप शोधता शोधताच माझ्यातली कलादृष्टी विकसित होत गेली आणि हळूहळू माझी अभिरुची घडत गेली.लोकजीवनात घडलेला माझा पिंडमाझा पिंड हा काही एका ठिकाणी घडलेला नाही. तो लोकजीवनाच्या शाळेत घडला आहे.गावात कीर्तन असले की मी हमखास हजर असायचो. अभंगाचा अर्थ, मृदंगाची थाप आणि टाळांचा नाद यातून भक्ती कशी शिकवली जाते हे मी तिथे शिकलो. जागरण-गोंधळ, भारूड, भजन या लोककलांमध्ये मला खरी कला दिसायची. भारुडातून विनोदाच्या अंगाने समाजाचे किती मोठे प्रबोधन होते, हे मला नवल वाटायचे. गावात नाटक आले किंवा तमाशाचा फड लागला की अख्खे गाव तिथे गोळा व्हायचे. तमाशातील लावणीचे अंगविक्षेप आणि त्यामागची लोकवेदना, नाटकातील संवादातील जीवनाचे तत्त्वज्ञान हे मी मन लावून टिपायचो.या कलांसोबतच समाजाचे दुसरे अंगही मी जवळून पाहिले. नेत्यांच्या सभा ऐकणे मला आवडायचे. त्यांची भाषणशैली, लोकांना भारून टाकण्याची त्यांची कला आणि समोर बसलेल्या गर्दीची मानसिकता मी अभ्यासायचो. निवडणुकीच्या प्रचारात तर मी हिरीरीने भाग घ्यायचो. भिंती रंगवणे, पत्रके वाटणे, घोषणा देणे यातून लोकशाहीचा उत्सव मी जवळून अनुभवला.आठवडी बाजार हे तर माझ्यासाठी एक जिवंत चित्रशाळाच होती. भाजीवाल्याच्या आरोळ्या, गुरांच्या बाजारात चाललेले घासाघीस, चहाच्या टपरीवर रंगलेल्या गप्पा, काचेच्या बांगड्या भरणारी एखादी नववधू - या प्रत्येकात मला एक चित्र दिसायचे. तसेच गावातील लग्न समारंभ. तिथली धावपळ, पाहुणचार, मानपान, रुसवे-फुगवे आणि तरीही दोन जीवांच्या नव्या प्रवासाचा आनंद - या सगळ्या अनुभवांनी मला माणूस म्हणून घडवले.कुंचला आणि मैदानया सगळ्यात माझ्या सोबत दोन आवडी कायम होत्या - चित्रकला आणि कबड्डी.कबड्डीच्या मैदानाने मला सांघिक भावना, चपळाई आणि डावपेच शिकवले. तर चित्रकलेच्या वहीने मला एकटेपणात रमायला शिकवले. विद्यार्थी चळवळीत मी सक्रिय होतो. अन्यायाविरुद्ध घोषणा देणे, भित्तीपत्रके लिहिणे, मोर्चात सहभागी होणे हे मला माझं कर्तव्य वाटायचं. तिथेही माझी चित्रकला मला उपयोगी पडायची.गावात कुणाकडे लग्न असेल किंवा गणपती उत्सव असेल तर गणपतीचे चित्र काढायला लोक मला आवर्जून बोलावत. मी ते काम मनापासून करायचो. पैशासाठी नाही, तर माझ्या कलेला लोकांकडून मिळणारी ती पावती होती. पण मनात एक खंत कायम होती. ती म्हणजे फोटोग्राफीची. फोटोग्राफी आणि चित्रकलेची प्रचंड आवड असूनही त्या काळात मला संधीच मिळाली नाही. कॅमेरा विकत घेणे हे आमच्यासारख्या सामान्य कुटुंबातल्या मुलासाठी स्वप्न होते. कॅमेरा नसल्यामुळे डोळ्यांनी टिपलेले हजारो क्षण मी मनातच साठवून ठेवले. त्या आवडीकडे नाईलाजाने दुर्लक्ष करावे लागले.पुढे नोकरीला लागल्यावर मी माझे पहिले स्वप्न पूर्ण केले. मी स्वत:साठी कॅमेरा विकत घेतला. आज माझ्याकडे दोन कॅमेरे आहेत. पण खरी गंमत झाली ती मोबाईलमुळे. मोबाईलमुळे फोटोग्राफी इतकी सोपी झाली की आता क्षण टिपण्यासाठी कॅमेऱ्याची वाट पाहावी लागत नाही. तेव्हापासून मी वेड्यासारखा फोटो काढत सुटलो आहे. सकाळचे दवबिंदू, शेतात राबणाऱ्या महिलेच्या कपाळावरचा घाम, एखाद्या म्हाताऱ्या आजोबांच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांत दडलेला इतिहास, पाण्यात पडलेले ढगांचे प्रतिबिंब - मी सगळं टिपतो आहे.दृष्टी बदलणारी गॅलरीमाझी दृष्टी आणखी विकसित झाली ती के. की. मूस यांची आर्ट गॅलरी पाहून. त्या गॅलरीत मी तासन्तास घालवले. एकाच विषयाकडे किती वेगवेगळ्या नजरेने पाहता येते, याचा मी तिथे अनुभव घेतला. चित्र म्हणजे केवळ रंग आणि रेषा नसून ती एक पाहण्याची दृष्टी आहे, हे मला तिथे कळले.मला कला आणि कलावंत माणसाविषयी प्रचंड आदर आहे. कलावंत हा गर्दीतला माणूस नसतो, तो गर्दीकडे तटस्थपणे पाहून तिचे चित्र मांडणारा असतो. आज अनेक मोठे चित्रकार माझे मित्र आहेत, याचा मला सार्थ अभिमान आहे.आज मला काय आवडते असे विचाराल, तर मला केवळ मोठ्या घटना, मोठे प्रसंग किंवा मोठ्या व्यक्तींचे व्यक्तिचित्रण यापेक्षा सामान्यातले असामान्यत्व अधिक महत्त्वाचे वाटते. मला गर्दीतला चेहरा टिपायला आवडतो. निसर्गाचे दुर्लक्षित पैलू मला जास्त लक्ष वेधून घेतात. पडक्या भिंतीवर उगवलेले छोटेसे रोप, वाऱ्यावर भिरभिरणारा कागद, उन्हात तापलेली मातीची भांडी - यातच मला खरे सौंदर्य दिसते.विद्यार्थी दशेपासून मी 'मार्मिक'चा वाचक आहे. मार्मिकने मला व्यंगातून गंभीरपणे कसे बोलावे हे शिकवले. बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्यातली ताकद आणि मार्मिकच्या लेखणीतली धार याने माझ्या विचारांना एक वेगळी दिशा दिली. आज ही मी निसर्गाशी जोडलेला आहे. निसर्ग मला खूप काही देतो, शिकवतो आणि माझ्याशी संवाद साधतो. मग ते डोंगर , नदी, झाडी, पशू पक्षी असो की भोवतालचा अवघा शिवार.माझा हा प्रवास अजूनही सुरू आहे. निसर्गाच्या रूपातून अरूपाकडे जाणारा हा प्रवास माझ्या शब्द कुंचल्यातून आणि माझ्या कॅमेऱ्यातून असाच सुरू राहणार आहे. अजून खूप चालायचे, जीवनाचा आणि जगण्याचा शोध घ्यायचा, त्याही पेक्षा माणसं वाचायची. त्यांचं जगणं सुख दुःख मांडायची . त्यामुळेच माझे पाय नकळतपणे निसर्गाकडे वळले जातात. तिथे काही नसते जात पात, धर्म, राजकारण, भेदाभेद, तो समता शिकवतो, माणुसकी चे दर्शन घडवतो. ताण तणाव कमी करतो. त्यामुळे निसर्गाची ओढ मला लहानपणापासूनच आहे.

**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**

## सामाजिक बांधिलकी पासून भरकटणाऱ्या नव्या पिढीला नव्या वाटा दाखवणारे बाबा आमटे यांचे कार्य




**उदगीर :** आरोग्यासाठी योग्य आहार महत्त्वाचे आहे. तसेच योग्य जीवन जगण्यासाठी योग्य असे मूलभूत शिक्षण देखील महत्त्वाचे आहे. परंतु आजची नवी पिढी उच्च शिक्षण घेऊन देखील नैराश्याचे जीवन जगत आहे. याचे कारण म्हणजे सामाजिक बांधिलकी पासून भरकटने होय. आदिवासी व दुर्गम भागातील मागास समाजाला सक्षम आणि सुदृढ बनवण्यासाठी हेमलकसा येथे लोक बिरादरीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी पासून भरकटणाऱ्या नव्या पिढीला नव्या वाटा दाखवण्याचे मौलिक कार्य बाबा आमटे यांनी केले आहे असे मत कु. जान्हवी श्रीराम गव्हाणे हिने व्यक्त केले. कुमार वयापासूनच आई-वडिलांच्या मार्गदर्शनातून सामाजिक बांधिलकीचे धडे गिरवणारी युवा सामाजिक कार्यकर्ती कु.जान्हवी श्रीराम गव्हाणे या अत्यंत जिज्ञासू हुशार व विचारवंत मुलीने प्रत्यक्ष अनेक सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होऊन तेथील कार्यात योगदान देत केलेला अभ्यास आणि दहा-बारा वर्षांपूर्वी लोक बिरादरी प्रकल्पाने उचललेली जबाबदारी आज बाबा आमटे यांची दुसरी तिसरी पिढी कशा पद्धतीने पुढे चालवत आहे, कामाचा वाढलेला आवाका व इतर घडामोडींचा संपूर्ण इतिवृत्तांत नवी पिढी नव्या वाटा या साहित्यकृतीच्या माध्यमातून मांडला. चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षापासून चालू असलेल्या व डॉ.वर्षा वैद्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या 368 व्या वाचक संवाद मध्ये डॉ. प्रकाश आमटे लिखित नवी पिढी नव्या वाटा या साहित्यकृतीवर संवाद साधताना कु.जान्हवी श्रीराम गव्हाणे पुढे म्हणाली की,अत्यंत दुर्गम अशा भागात निरक्षर आदिवासी समाजासाठी हेमलकसा मध्ये चालू केलेले कार्य, बदलत चाललेल्या वर्तमानात देखील चळवळीशी जोडलेल्या प्रगल्भ माणसामुळे बाबा आमटे यांचे स्वप्न कसे पूर्ण करत आहेत. याबद्दल सविस्तर असे विवेचन देखील कु. जान्हवी केले. अत्यंत प्रभावी मांडणी आणि प्रेरणादायी ठरलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना डॉ. वर्षा वैद्य म्हणाल्या की अत्यंत दुर्गम भागात चालू असलेले कुष्ठरोग्यांसाठीचे हे कार्य पाहण्यासाठी अनेक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते देश विदेशातून देखील येतात. स्वतः तेथे सेवा देतात याचा आदर्श आजच्या नवतरुणांनी घ्यावा असे आव्हान केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर जाधव यांनी केले, संवादिकेचा परिचय तिचे वडील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीराम गव्हाणे यांनी करून दिला. शेवटी आभार प्रा. सुरेश शिंदे बंबरेकर यांनी मानले. या कार्यक्रमास लातूर चे प्रसिद्ध साहित्यिक डॉ. ज्ञानदेव राऊत, यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यशस्वीततेसाठी संयोजक अनंत कदम, हणमंत म्हेत्रे, प्रा. राजपाल पाटील आदींनी परिश्रम घेतले.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903